(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# कोरोना आणि मानवी जीवनशैलीतील बदल

**कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण**, एम. ए. प्रथम वर्ष (राज्यशास्त्र विभाग),सामाजिकशास्त्र प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

.......................................................................................

**प्रस्तावना—** कोरोनाच्या जागतिक महामारी संघटने येत्या काळात काय बदल होतील हे निश्चित सांगता येत नसले तरी मानवी जीवनशैलीवर मात्र अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. भारतात सर्वप्रथम कोरोना विषाणूचे आगमन ३० जानेवारी २०२० रोजी केरळ मधील त्रिसुर शहरात झाली त्यानंतर या विषाणूने संपूर्ण देशाला घेतलं. कामगार बेरोजगार झाले त्यामुळे त्यांच्या कुटुंबात कलह निर्माण होऊ अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाले. हा करून काळ जणू रोजगारांच्या जीवावर उठलेला दिसून येतो. हाताला काम नाही, पोटाला भाकरी नाही, गावी जाण्यासाठी वाहन नाही सगळीकडे टाळेबंदीच !!

कारोनाच्या संकटामुळे आर्थिक मंदीचे संकट उद्‌भवणार हे अपेक्षितच होते त्याचे परिणाम स्पष्ट दिसू लागले आहे. माननीय नरेंद्र मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत अंतर्गत मोठ्या आर्थिक मदतीची घोषणा जाहीर केली असली तरी प्रत्येक घटकापर्यंत मदत पोहोचणे अशक्य आहे. त्यासाठी संकटांचे नियोजन करणे आवश्यक आहे. कोरोनाने जगासमोर महासंकट आणले आहे. त्यात देशाची समाजाची नव्हे तर सामान्य जनतेची देखील कसोटी लागत आहे. सामाजिक अंतर निर्माण झाले नातेवाईक, मित्र, व्यक्ती—व्यक्तीपासून दुरावत आहे. सामाजिक दरी निर्माण झाली आहे. कौटुंबिक स्वास्थ्य बिघडले आहे. या विषाणूमुळे लहान मुलापासून ते वृद्ध वयाच्या व्यक्तींच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे.कोरोना महामारी एवढ्यापुरतीच मर्यादित न राहता क्रीडा क्षेत्रात देखील विपरीत हानी झालेली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन उपेक्षित घटकांवर परिणाम झाला आहे.भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होऊन नवीन आव्हाने उदयास आली आहेत. उदा. चीन, अमेरिका, नेपाळ तसेच जी ७ परिषद यांच्यापुढे नवीन आव्हाने निर्माण झाले आहेत.

सरकारी भोंगळपणा मुळे कामगारांच्या वाट्यला जगण्या—मरण्याचा संघर्ष आला आहे. कित्येक जीव जात आहेत. डॉक्टर पोलीस अशा अनेक सेवकांचे जीवन संकटात आले आहे. संपूर्ण जग करोना विषाणू विरुद्ध लढत आहे या पार्श्र्वभूमीवर आत्मनिर्भर भारताचे नगारे वाजत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे** —

- कोरोना विषाणूमुळे डॉक्टर, पोलीस यासारख्या अनेक अत्यावश्यक सेवा देणारे व्यक्ती व त्यांच्या कुटुंबावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
- कोरोना विषाणूचा प्रसार झाल्यानंतर मानवी जीवनात झालेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय बदलाचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके** —

- अत्यावश्यक सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावर अनेक विपरीत परिणाम झाले त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवा देणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबावर देखील दूरगामी परिणाम झाले.
- मानवी जीवनावर कोरोना विषाणूमुळे मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे.
- आर्थिक मंदी निर्माण झाल्याने सर्वसामान्य जनतेवर परिणाम झाला आहे.

**विषयाची निवड** —

कोरोना विषाणूने जगभर थैमान मांडले आहे. प प्राथमिक, द्वितीय तसेच सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहे. अत्यावश्यक सेवा देणारे लोक स्वत:चा विचार न करता सामान्य जनतेसाठी सेवा देत आहेत. मोठ्या प्रमाणावर मानवी जीवन विस्कळीत झाले आहे या सर्वांचा विस्कळीत अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते म्हणून सदर संशोधकाने कोरोना आणि मानवी जीवनशैलीत झालेले बदल या विषयाची निवड केली आहे.

**विषयाचे महत्त्व –**

कोरोना या विषयाचा फैलाव झाला तेव्हापासून विद्यार्थी–पालक, कामगार, नोकरदार वर्ग, क्रीडा, मनोरंजन यासारख्या अनेक क्षेत्रावर परिणाम झाला आहे. आणि पर्यायाने याचा मानवी जीवनशैलीवर परिणाम होत आहे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.मानवी जीवनशैलीत मोठा बदल झाला आहे याचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे म्हणून सदर संशोधकाने या विषयाची निवड केली आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन करताना संशोधकाने विश्लेषणात्मक वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

उदा.– दैनिक वृत्तपत्र, मासिके, त्रिमासिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**विषय विवेचन –**

२२ मार्च २०२०पासून संपूर्ण देशभर टाळेबंदी जाहीर करण्यात आली.तेव्हापासून देशातील सर्व मानवी जीवनशैलीवर आमूलाग्र बदल झाला. मानवी जीवनशैलीवर कोरोना विषाणूचा सकारात्मक व नकारात्मक बदल झाले आहे.

**नकारात्मक बदल –**

उद्योगधंद्यातील कामगार शेतमजूर वर्गाची जीवनशैली झालेले बदल –

२२ मार्च २०२० रोजी टाळेबंदी घोषित केली आणि उद्योगधंदे बंद पडले. त्यामुळे अनेक कामगार मजूर यांचे काम बंद पडले. त्यामुळे मोठ्या शहरात कांदा राहणे परवडत नव्हते त्यांची आपल्या घराकडे जाण्याची धडपड सुरू झाली. पण सर्व जिल्हा राज्याच्या सीमा बंद केल्यामुळे कामगार मजूर परिवाराला सोडून राहू लागले. एकीकडे हाताला काम नाही आणि परिवारापासून दूर त्यामुळे कामगार वर्गाच्या जीवनशैलीवर परिणाम होऊ लागले. पादुर्भाव अधिक वाढत गेला गोटू गावाकडे खेड्यकडे शिरकाव करु लागला त्यामुळे शेतमजुरांना देखील त्यांच्या कामाला आळा बसला.

भारतातले लाखो स्थलांतरित कामगार मजुरांचे हाल झाले. भारताच्या करना विरुद्धच्या लढाईत सर्वात मोठा हृदयद्रावक असा अध्याय म्हणावा लागेल.परराज्यात कंगाल अवस्थेत अडकलेले मजूर कामगार घरी जाण्यास आतुर झाल्या आहेत हे टाळेबंदी जाहीर झाल्यावर पहिल्याच काही तासात स्पष्ट झाले होते.अशा संकटाच्या काळात आपल्या घरी पोहोचणे ही त्यांची आर्थिक तसेच भावनिक गरज होती.

टाळेबंदी जाहीर होतात देशभरातील रेल्वेची सर्व प्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद केली गेली. त्यामुळे दररोज जवळपास एक कोटी प्रवाशांच्या वाहतुकीची क्षमता रेल्वेकडे उपलब्ध होती.सोशल डिस्टन्सइनचा नियम पाळून क्षमतेने गाड्या चालल्या असत्या तर त्यावेळेला रेल्वेला ६० लाख प्रवाशांना व खास करून या स्थलांतरित कामगारांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात घरापासून ते शहरापर्यंत नेऊन सोडणे अशक्य होते.या हिशोबाने टाळेबंदी नंतरच्या पहिल्या पाच दिवसात तीन कोटी प्रवाशांची वाहतूक रेल्वेला सहज करता आले असते परंतु रेल्वे मंत्रालयाने केले नाही.अशा प्रकारे या स्थलांतरित कामगार व मजुरांचे सहा आठवडे केल्यानंतर त्यांच्यासाठी विशेष श्रमिक रेल्वेगाड्या सोडण्यास १ मेपासून मोठा गाजावाजा करून सुरुवात केली गेली. या विशेष गाड्यांचे भाडे आकारणी ''शताब्दी'' व ''राजधानी'' यासारख्या गाड्यांच्या धरतीवर केले गेल्याने या प्रवासी कामगारांना व मजुरांना भाड्यपोटी प्रत्येकी ७०० ते ९०० रुपये खर्च करावे लागले. शिवाय रेल्वे स्टेशन पर्यंत येण्यासाठी चढत्या दराने पैसे मोजावे लागले.या मजुरांना केंद्र सरकारने वार्यावर सोडले असले तरी काही राज्यांनी मात्र त्यांची जबाबदारी पेलली. उदा.–पश्चिम बंगाल सरकारने परराज्यातून राज्यात परत आलेल्या सर्व स्थलांतरित मजुरांच्या प्रवाशांचे पैसे स्वत: दिले.

कुशल कामगार त्यांच्या गावी गेले आहेत आणि जर ते परत आले नाही तर त्याला कोठेतरी सरकार जबाबदार आहे असे लक्षात येते. कारण घर भाडे माफ करण्यासाठी सरकारने कोणतेही पाऊल उचलले नाही.व त्यांना अन्नसुद्धा पुरवले नाही त्यांना थांबवले ते परत

जाण्यासाठी राज्य सरकारने प्रोत्साहन दिले त्यामुळे बांधकाम व कृषी क्षेत्रातील कामगार तुटवडा होईल असे लक्षात येते.

**नोकरदार वर्गात झालेले बदल –**

सरकारी नोकरी व खाजगी नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपले काम थांबवावे लागले त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे काम केले परंतु यावर उपाय म्हणून ूवता तिवउ भ्वउम ही संकल्पना पुढे आली. परंतु काम करून देखील कर्मचाऱ्यांना खाजगी कंपन्यांकडून मोबदला मिळत नाही, तसेच ूवता तिवउ भ्वउम मुळे सुरुवातीला चांगले काम झाले. परंतु नंतर कौटुंबिक अडचणीत वाढझाली. तसेच ८–८ तास बैठे काम केल्याने अनेक शारीरिक व्याधी निर्माण झाल्या. पती–पत्नीत बेबनाव निर्माण होऊन कौटुंबिक कलह निर्माण झाले.

सरकारी कर्मचाऱ्यांना किती देखील यापेक्षा वेगळी नाही.सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामापेक्षा वेगळे काम देण्यात आले आहे. उदा. शिक्षकांना स्वस्त धान्य दुकानावर जिल्ह्याच्या ठिकाणावर काही त्यांना सेवा देण्यास भाग पाडले. इतर सरकारी कर्मचाऱ्यांचे देखील हीच परिस्थिती आहे.

शिक्षिका, परिचारिका तसेच घर कामगार अशा क्षेत्रात अजूनही मोठ्य प्रमाणात महिलावर्ग काम करतो. ही क्षेत्रे अजूनही महिलांची समजली जातात.घर कामगार महिलांच्या रोजगारावर तर कोरोनमुळे सध्या मोठ्य प्रमाणावर संकट आलेले आहे. सध्या अनेक घरातून घरकाम करणाऱ्या स्त्रियांना सांगितले आहे. शिक्षक, कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिला यांचा समावेश आलाच. अनेक उच्चशिक्षित पालक होम स्कूलिंग करत आहेत पण हे सगळ्यांनाच शक्य नाही.पोषक आहार बनवणाऱ्या स्त्रिया व त्यांच्यासारख्याच अनेक इतर क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या नोकरीचा प्रश्न आहेच.

थोडक्यात आपण असे म्हणू शकतो की वर्क फ्रॉम होम करत असताना महिला वर्गाचे मोठ्य प्रमाणावर तारेवरची कसरत होत आहे कारण सर्वच कुटुंबात महिलांना कामासाठी पाठींबा मिळत असेल असे नाही.अनेक खाजगी कंपन्या ऑनलाईन ॲप द्वारे काम करत आहेत पण ते कितपत सुरक्षित आहेत याची खात्री अद्यापही देता येत नाही.

**अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वर्गात झालेला बदल –**

सामान्यपणे या क्षेत्रात डॉक्टर, नर्स, पोलीस, सफाई कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, दूध व दुग्धजन्य पदार्थ वितरक यांचा समावेश यात होतो. वर्ग आपल्या कुटुंबाची व आपल्या स्वतःची पर्वा न करता सर्वांसाठी कार्यरत आहे. डॉक्टर, नर्स, पोलीस, आरोग्य कर्मचारी आपला जीव धोक्यात घालून या विषयावर विरुद्ध लढत आहे.या सर्व सेवा देणाऱ्या कुटुंबाचा विचार केला तर लक्षात येते की ते आपल्या कुटुंबाचा विचार न करता या विषयावर विरुद्ध म्हणजे सामान्य जनतेला या विषाणू पासून बचाव करण्यासाठी महत्त्वाचे योगदान देत आहेत. पोलीस, डॉक्टर, नर्स, आरोग्य कर्मचारी, सफाई कर्मचारीत्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा व लहान मुलांचा विचार न करता आपल्या साठी लढत आहेत. यावरून लक्षात येते की त्यांच्या जीवनशैलीत किती मोठा बदल झाला आहे.

सध्या आरोग्य संस्थेत पुढे मात्र मोठे आव्हान शोधणे शोधलेला रुग्णांना उपचार करणे त्यांच्या वैद्यकीय तपासण्या करून पुरवठा करणे.त्यातून उपचार पूर्ण करणारे, निदान झाल्यावर घर, मोबाईल क्रमांक, कामाची जागा बदलून जाणारे लोक आहेच. अशांनाच उपचार देणे शक्य होते असे लोक त्यांच्या चुकांमुळे रोग पसरवत आहेत त्याचा परिणाम डॉक्टर, पोलीस व इतर सर्वांना होत असल्याचे दिसते.

**शैक्षणिक क्षेत्रात झालेले बदल –**

साधारणपणे १६ मार्च पासून शाळा महाविद्यालय बंद झाली. विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. सुरवातीला परीक्षा रद्द करण्याच्या प्रक्रियेत १ ते ९ व ११ वी च्या परीक्षा रद्द करण्यात आल्या पण नंतर कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव जसजसा वाढत गेला तस तसे शिक्षणाबाबत काही निर्णय घेतले गेलेले निर्णय म्हणजे दहावी व बारावीच्या बोर्डाचे काही पेपर रद्द करण्यात आले त्यात मोठी कसरत झाली ती शिक्षकांची कारण कोरोना विषाणूने मोठ्य प्रमाणात थैमान घातले होते.त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे ५० टक्के वेतन

कपात करण्यात आले.परीक्षा रद्द झाल्यामुळे शिक्षकांना मागील परीक्षांची सरासरी गुणांकन म्हणून १ ते ९ व ११च्या विद्यार्थ्यांना गुण घेऊन पास करावे असे सांगण्यात आले.

त्यानंतर करोना विषाणूंचा प्रादुर्भाव अधिक वाढत गेला व सर्व शाळा व महाविद्यालयांनी zoom, Google meet, webx, meeting, Google duo, Skyp यासारख्या व्हिडिओ ॲप द्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शक शिक्षक देऊ लागले.परंतु यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकटेपणाची भावना निर्माण झाली. कारण शाळा—महाविद्यालयात असल्याने अनेक मित्र—मैत्रिणी, शिक्षक यांच्याशी समोरासमोर विचारांची देवाण—घेवाण होते. त्यामुळे वैचारिक पातळी वाढण्यास मदत होते.परंतु ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थी शिक्षक यांच्या विचारांची योग्य प्रकारे देवाण—घेवाण होत नाही. काही काळानंतर घरगुती शिकवणी घेणार्या शिक्षकांनी देखील हीच संकल्पना वापरून ऑनलाइन शिकवण्यास सुरुवात केली. त्यामुळे विद्यार्थी तासन्तास मोबाईल, लॅपटॉप, टॅब समोर बसून हा त्यामुळे मुलांची मानसिक शारीरिक क्षमतेत आमूलाग्र बदल झाला. यामुळे कुठेतरी लहान मुलांना मोबाईल देऊ नये ही संकल्पना मागे पडली असे जाणवते.कोरोना विषाणूचा फैलाव वाढत गेला मग UGC ने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करण्यात कराव्या अशी घोषणा केली. त्यामुळे शिक्षकांच्या कामात भर पडली म्हणजेच विद्यार्थ्यांचे internal exam project seminar presentation ५० टक्के सरासरी काढून विद्यार्थ्यांना पास करावे असे सांगितले. नंतर विद्यार्थ्यांनी शेवटच्या वर्षाच्या परीक्षा सुद्धा रद्द करा असा प्रस्ताव मांडला आहे. परंतु यात काही विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांचा काय हा मुद्दा आहे.

एकंदरच या करोना विषाणू ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थी व शिक्षकांच्या जीवनशैलीत बदल झालेला दिसतो.

**क्रीडा व मनोरंजन क्षेत्रात झालेले बदल —**

कोरोना विषाणूने सर्वच क्षेत्रात मोठ्य प्रमाणात बदल झाला. मोठे मनोरंजन क्षेत्र असो की इतर कोणतेही क्षेत्र असो. आयपीएल वर्ल्ड कप यासारखे कार्यक्रम रद्द करावे लागले आहे. चित्रपट, मालिका यासारख्या अनेक कार्यक्रमांना प्रेक्षकांना मुरड घालावी लागली. या क्षेत्रातील सर्व व्यक्तींना आपले काम सोडून घरात बसणे पसंत करावे लागत आहे त्यामुळे त्यांच्या जीवनमानात बदल झाला. करुणा विशाल चा सर्वात मोठा परिणाम हा विवाह, धार्मिक कार्यक्रम या बाबींवर होताना दिसतो.

**सकारात्मक बदल**

कोरोना विषाणूने आगमन केल्यानंतर जगभर टाळेबंदी घोषित केली गेली तर सर्व लोक आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवू लागले. काही व्यक्तींना आपलाच लपलेला माणसाला शोधण्यात वेळ मिळाला चित्रकला, संगीत, नृत्य, वाचन, लिखाण, मूर्ती बनवणे,जवद चंपदजपदह यासारखे अनेक कौशल्या झोपासण्यास वेळ मिळाला. शिवणकाम पाककला भरत काम यासारख्या कलांना वेळ देता आला. विविध पुस्तके वाचून नवनवीन शिकण्याची उमेद मिळाली. ऑनलाईन सेमिनार द्वारे प्राप्त करता आले. घरात बसून देखील कार्यालयीन काम सहज करता येते हा नवीन दृष्टीकोन रुजू झाला.काही कलाकार मंडळी देखील घरी बसून आपल्या प्रेक्षकांचे करत आहेत तर काही कलाकार व खेळाडू कोरोना ग्रस्त लोकांच्या मदतीस धावून गेले. यामुळे त्यांच्यातील नवीन माणूस ओळखण्यास मदत झाली.

COVID—१९ नंतर अनेक नव्या संधी उद्योग व्यवसाय क्षेत्रात उभा राहणार आहे.त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व त्यातही वाढेल या सर्व संधीचे सोने केले व भविष्याचा वेध घेत आज मेहनत केली तर आपण आत्मनिर्भर भारत उभा करून हे निश्चित !! माननीय नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर संकल्पनेची व्याख्या करताना म्हटले आहे की Made in India, Made for world यातून लक्षात येते की भविष्यात नक्कीच नवनवीन संधी उपलब्ध होतील.

दुसरीकडे पर्यावरणाचा विचार केला तर प्रदूषण कमी होण्यास मोठ्य प्रमाणात मदत झाली त्यामुळे पर्यावरणीय समतोल साधला गेला.

उदा.—गंगा नदीचे तळे प्रथमच दिसून आले, बरोबर असलेले डोंगर दिसून आले, हवा, पाणी, ध्वनी यात कमालीचा फरक पडलेला आहे.

निष्कर्ष

- अत्यावश्यक सेवा देणाऱ्या नोकर वर्गाच्या मानसिक व शारीरिक क्षमतेवर परिणाम झाला. समाजापासून कुटुंबापासून दूर गेले व सरकारी नोकरीच शासकीय दृष्ट्या कामाला आली आहे. म्हणजेच खाउजा (खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण) ही संस्कृती अशा वेळेस उपयोगात येत नाही हेच यावरून सिद्ध झाले. म्हणूनच खाजगी करण्यापेक्षा सरकारी यंत्रणा केव्हाही चांगली.
- उपेक्षित घटक आणि सीमांत समूहावर मोठ्या प्रमाणात आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक बदल झालेले दिसून येतात.
- परराष्ट्र धोरणावर देखील याचा परिणाम झाला आहे.
  उदा. भारत—चीन, अमेरिका—चीन, भारत—नेपाळ यांच्या संदर्भात झालेले बदल होय
- महिलांसाठी रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतात.
- सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कामगार हे परत कामाच्या ठिकाणी जाण्यास तयार नाही.त्यांची भावना अशी आहे की आम्हाला आता आमच्या गावात राहून हवे ते काम करू. मुंबई,अहमदाबाद, सुरत यासारख्या शहरात परत जाणार नाही.
- पर्यावरणाचा समतोल साधण्यास मदत झाली आहे. पर्यावरणीय समस्यांना आळा बसल्याचे दिसते.सर्व प्रकारचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी झाले त्यामुळे मनुष्य स्वस्तात समतोल होण्यास मदत झाली.

**सूचना**

- रोजगाराच्या दृष्टीने ग्रामीण भागात औद्योगिक वाढ करण्यात यावी. उद्योगधंद्यांचे विलगीकरण करण्यात यावे.
- कामगार व मजुरी यांच्या आरोग्याची व उपजीविकेची चांगल्या प्रकारे काळजी घेण्यात यावी शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
- कामगार स्थलांतर करणार नाही या दृष्टीने प्रयत्न करणे, त्यांना आहे त्या ठिकाणी उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे.
- वैद्यकीय सेवा ही सर्वांना मोफत पुरवली जावी.

**संदर्भ**

१ दिनांक ३१ मे २०२० लोकमत रविवार पान क्र. ४
२ दिनांक ०२ जून २०२० लोकमत सखी मंगळवार पान क्र. ५, अर्थचक्रध्राष्ट्र पान क्र. ७
३ दिनांक १ जून २०२० लोकमत संपादकीय पान क्र.४
४ दिनांक ३१ मे २०२०, दिनांक १७ मे २०२० लोकसत्ता चतुरंग पुरवणी.